महाराष्ट्र शासन
गृह विभाग

**अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे**

फोन क्र : (०२०) २६१२७९०६ Website : www.mahaprisons.gov.in

# महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा वार्तापत्र

माहे मे-२०२२

## सारांश

- बंदीपुनर्वसन व बंदी कल्याण कार्यक्रम
- आरोग्य विषयक
- विधी विषयक सहाय्य
- बंदी व्यास पीठ

## संपादकीय संदेश



**श्री. अतुलचंद्र कुलकर्णी**
**अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.**

गुन्हा करणे किंवा गुन्हा करण्याची प्रवृत्ती असणे हे मानसिक रोगांच्या लक्षणांपैकी एक लक्षण आहे. व्यक्तीच्या शारिरीक आरोग्या इतकेच मानसिक आरोग्य देखील तितकेच महत्वाचे आहे. कारागृहातील बंद्यांचे शारिरीक व मानसिक आरोग्य चांगले राखणे ही कारागृहातील वैद्यकीय अधिकारी यांचे बरोबरीने कारागृहातील अधिकारी **व** कर्मचारी यांची देखील जबाबदारी आहे. कारागृहात प्रवेश केल्यापासुन ते सुटके पर्यंत बंद्यांच्या शारिरीक व मानसिक आरोग्याची काळजी घेणे कारागृह प्रशासनाचे कर्तव्य आहे. प्रवेशाच्या वेळी बंद्यांना काही बाहय शारिरीक किंवा अंतर्गत दुखापत आहे किंवा नाही हे प्रवेशाच्या वेळी मुख्यव्दारात असलेल्या आज्ञांकित अधिकारी व संबंधीत कर्मचा-यांनी पाहणे अत्यंत आवश्यक आहे. याकडे दुर्लक्ष झाल्यास पुढे उद्भवणा-या कायदेशीर अडचणींना विनाकारण कारागृह प्रशासनास तोंड दयावे लागते. त्याकरीता बंद्यांच्या प्रवेशाच्यावेळी हिंसाचाराच्या/मारहाणीच्या अलीकडील खुणा किंवा मुक्कामार असल्यास आज्ञांकित अधिकारी आणि वैद्यकीय अधिकारी यांनी ताबडतोब अधिक्षकांच्या निदर्शनास आणुन पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे.

बंद्यांच्या वैद्यकिय तपासणी व उपचाराबाबत त्रुटींचा अभ्यास करणे, त्यामध्ये योग्य सुधारणा करणे, शिफारशी सुचविणे आणि अमंलबजावणी करणेकरीता उपाययोजना करणेबाबत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन महाराष्ट्र राज्य मुंबई व संचालक,आरोग्य सेवा, मुंबई यांच्या समन्वयाने मुख्यालयाच्या स्तरावर एक समीतीचे गठन करुन या समीतीच्या बैठका घेण्यात आल्या आहेत. कारागृहाबाहेरील शासकीय रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालये यामध्ये बंद्यांना आंतररुग्ण म्हणुन दाखल करण्याबाबत मानक प्रणाली (SOP) या समीतीने

तयार केली आहे व त्याबाबत आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सबंधीत वैद्यकीय अधिका-यांना सुचना देखील देण्यात आलेल्या आहेत. बंद्यांच्या आरोग्य तपासणीबाबत वैद्यकीय अहवाल सादर करणे संदर्भात मा. राष्ट्रीय मानवी हक्क आयोग व मा.उच्च न्यायालय यांनी एक नमुना ठरवुन दिला असुन, त्या नमुन्याप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे. सदरील नमुना संचालक, वैद्यकीय शिक्षण व संचालक आरोग्य सेवा यांनी सर्व जिल्हा शल्य चिकीत्सक व अधिष्ठाता यांना पाठविण्यात आला असुन त्यानुसार सर्व जिल्हा रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालयांची रुग्णालयेकडून कार्यवाही होणार आहे, कारागृह अधिक्षकांनी देखील याबाबत कटाक्षाने लक्ष दयावे. आरोग्य विभागाने बंद्यांवर करण्यात आलेल्या औषधोपचाराबाबत मासिक अहवाल कारागृह अधिक्षकांना पाठविण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. किमान आठवडयातुन एकदा MD General Medicine, MDS Dentistry, MD Dermatology, MD Psychiatry, MD Gynecologist यासारखे तज्ञ वैद्यकीय अधिकारी कारागृहात भेटीस पाठविण्याबाबत आरोग्य विभागास अवगत करण्यात आले आहे. तसेच बंद्यांच्या मानसिक नैराश्यासाठी व समुपदेशनाकरीता शासकीय रुग्णालयातील मानसोपचार तज्ञ किंवा समुपदेशक यांचेमार्फत बंद्यांच्या मानसिक आरोग्यासाठी उपाययोजना करणेबाबत जिल्हा सामान्य रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालयांची रुग्णालये यामधील प्रिझन वॉर्ड सुस्थितीत ठेवण्याबाबत संबंधीत आरोग्य यंत्रणेच्या अधिका-यांना कळविण्यात आले आहे. या सर्व बाबतचा पाठपुरावा अधिक्षकांनी करावा.

कारागृह अधिक्षकांनी आरोग्य विभागाच्या अधिका-यांशी योग्य तो समन्वय साधुन बंद्यांच्या आरोग्याबाबत काळजी घ्यावी.कारागृह विभागातील सर्व अधिकारी कर्मचारी व सर्व बंदीजन यांच्या सुदृढ आरोग्याची कामना करतो.

# बंदीपुनर्वसन व बंदी कल्याण कार्यक्रम

**येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे "जिव्हाळा" योजने अंतर्गत बंद्यांना कर्ज वाटप**

सुधारणा व पुनर्वसन हे कारागृह सुधारसेवा विभागाचे ब्रीद असुन त्या अतंर्गत बंद्यांकरीता विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येतात. बंदी कारागृहात बंदीस्त असतांना त्यांना त्यांच्या परिवाराची चिंता भेडसावत असते. त्याकरीता सामाजिक बँकिंगचा सतत पुरस्कार करणा-या सहकारी बँकींग क्षेत्राचे पालकत्व स्विकारलेल्या दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने दिर्घ मुदतीची शिक्षा भोगत असलेल्या बंद्यांच्या कौटुंबिक गरजा भागविण्यासाठी, शेतीची कामे करण्यासाठी, मुलांच्या शैक्षणिक गरजा भागविण्यासाठी, घरातील नातलगांच्या औषधोपचारासाठी बंद्यांच्या कारागृह उद्योगात काम करत असलेल्या उत्पन्नावार आधारीत कर्ज योजना सुरु केली असुन सदर योजनेला महाराष्ट्र शासनाने दिनांक २९.०३.२०२२ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे प्रायोगिक तत्वावर राबविण्यास मान्यता दिलेली आहे. १ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधुन येरवडा मध्यवर्ती कारागृहातील ३ पुरुष व २ महिला अशा ५ बंदयांना प्रातिनिधिक स्वरुपात ५०,०००/-रुपये कर्ज वाटप योजनेचा शुभारंभ महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री मा. ना. श्री. दिलीप वळसे पाटील यांच्या शुभ हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमास मा. अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य पुणे श्री. अतुलचंद्र कुलकर्णी, मा. कारागृह उपमहानिरीक्षक पश्चिम विभाग पुणे श्री. योगेश देसाई, दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मुंबई शाखेचे अध्यक्ष तथा प्रशासक श्री. विद्याधर अनास्कर, व्यवस्थापकीय संचालक डॉ. अजित देशमुख, मा.प्रभारी कारागृह उपमहानिरीक्षक (मुख्यालय) श्री. सुनिल ढमाळ, कारागृह अधीक्षक श्रीमती राणी भोसले हे उपस्थित होते.

बंद्यांना कारागृहात काम करुन मिळणा-या मोबदल्यामधुनच त्यांना देण्यात आलेल्या कर्जाची परतफेड होणार आहे. सदर कर्जाचा विनियोग हा बंद्यांच्या कुटुंबियांसाठी होणार असला तरी त्याची परतफेड मात्र बंद्यांना कारागृहात मिळणा-या उत्पन्नातुन होणार असल्याने बंदी व त्याचे कुटुंब यांच्यामधील भावनिक सलोखा वाढीस लागण्यास मदत होणार आहे, म्हणुनच बँकेने सदर कर्ज योजनेला "जिव्हाळा"कर्ज योजना असे नाव दिले आहे.

भविष्यकाळात बँक सदर कर्ज रक्कमेत वाढ करुन एक लाख रुपयांपर्यंतचे कर्ज बंद्यांना उपलब्ध करुन देणार आहे. तसेच सदर कर्ज हे द.सा.द.शे. ७ % व्याजदराने देण्यात येणार आहे. या कर्ज योजनेमध्ये बंद्यांना कोणत्याही प्रकारचे तारण अथवा जामिनदाराची आवश्यकता राहणार नसुन कर्ज मंजुरी दरम्यान बंद्यांकडुन कोणतेही शुल्क किंवा प्रोसेसिंग फि आकरण्यात येणार नाही. त्याचप्रमाणे बंद्यांनी केलेल्या कर्ज परतफेड रकमेच्या १ % रक्कम बंद्यांच्या कल्याण निधी (प्रिजनर वेलफेअर फंड) मध्ये जमा करण्यात येणार आहे, अशी या योजनेची वैशिष्ठे आहेत.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा.कारागृह उपमहानिरीक्षक, श्री योगेश देसाई यांनी केले, तर सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. अजित देशमुख यांनी केले. या कार्यक्रमास कारागृहाचे उपअधीक्षक श्री. पी.जे.जगताप, श्री. शिवशंकर पाटील, श्रीमती पल्लवी कदम तसेच कारागृह अधिकारी व कर्मचारी व बंदीजन हजर होते.






## राज्यातील विविध कारागृहात कैद्यांकडून शेतीमध्ये ९ कोटींचे उत्पन्न, पैठणमध्ये गव्हाचे विक्रमी उत्पादन.

**(लोकसत्ता वार्ताहार-नागपूर,ई-पेपर)**

राज्यभरातील कारागृहाच्या अखत्यारित असलेल्या ३३० हेक्टर शेतीमध्ये कैद्यांनी गेल्या तीन वर्षात ९ कोटी रुपायाचे उत्पादन घेतले. कैद्यांच्या परिश्रमामुळे राज्य कारागृह प्रशासनाला कोटयवधीचा नफा झाल्याने आर्थिक बळ मिळाले आहे.ज्या कैद्यांच्या हातात कला-गुण आहेत, अशा कैद्यांना मजुरी देऊन काम करुन घेतले जाते.त्यासाठी राज्यातील सर्वच कारागृहात योती, उद्योग, कारखाने आणि प्रकल्प सुरु करण्यात आले असून त्यामध्ये प्रशिक्षणानंतर कैद्यांना कामावर ठेवले जाते राज्यात एकूण ४३ कारागृह आहेत.त्यामध्ये नऊ मध्यवर्ती कारागृह,२५ जिल्हा, पाच खुली कारागृह, एक मिहला कारागृह आहे.या सर्व कारागृहांत जवळपास २२ हजारांपेक्षा जास्त कैदी आहेत.मध्यवर्ती व जिल्हा कारागृहात असणारे कच्चे कैदी आहेत. मध्यवर्ती व जिल्हा कारागृहात असणारे कच्चे कैदी आणि शिक्षा झालेल्या कैदी या उद्योगधंद्याबरोबर शेतीमध्येही काम करतात.

गेल्या काही वर्षामध्ये होणारी खरीप, रबी आणि उन्हाळी अशा तीनही हंगामामध्ये होणारी शेती कारागृह विभागाचा खर्च भागवण्यासाठी महत्वाची भूमिका बजावत आहे.शेतीचे उत्तम ज्ञान असलेल्या कैद्यांकडून फळभाज्या, पालेभाज्या, ऊस, भात, गहू, ज्वारी, तूर, सोयाबीन, केळी अशा पिकांचे उत्पादन घेतले जाते.२०१८-१९ या आर्थिक वर्षात कारागृह विभागाने शेतीमधून ४ कोटी ९ लाख रुपायांचे उत्पादन घेतले.२०२० मध्ये ४ कोटी ३८ लाखांचे उत्पादन घेतले.२०२१ आणि २०२२ मध्ये करोनामुळे अनेक कैदी संचित रजेवर सोडल्यामुळे उत्पादन घटले.

### पुण्यात शेतीपूरक व्यवसाय

पुणे कारागृहात सेंद्रिय शेती केली जाते.देशी बियाण्यांची पेरणी केली जाते.भाजीपाल्याच्या शेतात कोणतेही रसायन शिंपले जात नाही.या शेतीतून मेथी, पालक, शेपू, कोथिंबीर, वांगी, टोमॅटो, कोबी, बटाटा, दोडका, भेंडी, मुळा पिकवला जातो. याशिवाय शेतीपूरक व्यवसायांमध्ये दुग्धोत्पादन, शेळी, बोकड आणि कुक्कुट पालन केले जाते.

### पैठण कारागृह अव्वल

शेती उत्पन्नाच्या बाबतीत पैठण येथील खुल्या कारागृहातील कैदी अव्वल क्रमांकावर आहेत. त्यांनी विविध प्रयोग करुन उत्पादन क्षमता वाढवली आहे.त्यानंतर विसापूर कारागृह व्दितीय तर नाशिक रोड खुल्या कारागृहातील शेतकरी कैद्यांचा क्रमांक लागतो. पैठण कारागृहात भाजीपाला, फळे, ऊस मोठया प्रमाणत पिकवला जात असून जवळच्या साखर कारखान्यात पाठवला जात आहे.हे विशेष.सुधारणा व पुनर्वसन असे ब्रीद बाळगणा-या राज्यातील कारागृहे शेतीला आधुनिक यंत्रसामुग्रीची जोड देत उत्पादन घेत आहेत.कारागृहात फक्त सेंद्रिय शेती केली जाते.



## कारागृह मुख्यालय येथे महाराष्ट्र कारागृह सांख्यिकी पुस्तीका २०२०-२०२१ चे प्रकाशन

मा.श्री. अतुलचंद्र कुलकर्णी, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे शुभहस्ते महाराष्ट्र कारागृह सांख्यिकी २०२०-२०२१ चे पुस्तकाचे दि.१९.५.२०२२ रोजी प्रकाशन करण्यात आले. सदरच्या प्रकाशन कार्यक्रमास मा.श्री.योगेश देसाई, कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे, मा.श्री.सुनिल ढमाळ, प्र.कारागृह उपमहानिरीक्षक (मुख्यालय), पुणे, श्रीमती. राणी भोसले, अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह व श्रीमती सुनेत्रा पाटील, सांख्यिकी अधिकारी तसेच कारागृह विभाग, मुख्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी वृंद उपस्थित होते.



## नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे शेतकरी ते ग्राहक साप्ताहिक भाजी पाला, फळ बाजाराचे उद्‌घाटन

दि.२५.४.२०२२ रोजी नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे National Intitute of Women Child and Youth Development,Besa Nagpur या संस्थेमार्फत आठवडी बाजार सुरु करण्यात आले आहे. शेतकरी ते ग्राहक साप्ताहिक भाजीपाला, फळ बाजाराचे उद्‌घाटन कारागृह उपमहानिरीक्षक मा.श्रीमती स्वाती साठे, मॅडम यांच्या शुभहस्ते नागपूर मध्यवर्ती कारागृहाच्या शासकीय निवासस्थान परिसरात करण्यात आले. कस्टकरांना योग्य किंमत मिळावी व ग्राहकांना योग्य दरात भाजी पाला,फळे व अन्य कृषी उत्पादनने मिळावी या हेतूने हे मार्केट दर सोमवारी सायंकाळी ४.०० ते ८.०० वाजे पर्यंत सुरु राहणार आहे.



### कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह येथे ध्यानधारणा,आध्यात्मिक ज्ञान व राजयोग

दि.०६.०४.२०२२ रोजी कोल्हापूर मध्यवर्ती कारागृहातील बंद्यांसाठी प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय,शाखा कोल्हापूर यांच्यामार्फत श्री.आनंदा भाई,प्रतिभा माताजी यांनी ध्यानधारणा,आध्यात्मिक ज्ञान व राजयोग ज्ञानातुन मनःशांती कशी मिळवावी याबाबतचे मार्गदर्शन केले.सदर ध्यानधारणेकरीता १४० बंद्यांनी सहभाग घेतला.तसेच या कार्यक्रमासाठी कारागृह अधीक्षक,वरिष्ठ तुरुंगाधिकारी व कारागृह शिक्षक उास्थित होते.




### कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह येथे ध्यानधारणा,आध्यात्मिक ज्ञान व राजयोग शिबीराचे आयोजन

दि.१९.४.२०२२ रोजी कोल्हापूर मध्यवर्ती कारागृहातील बंद्यांकरीता प्रजापीता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय,शाखा कोल्हापूर यांच्या वतीने साप्ताहिक राजयोग मनःशांती शिबीराचे समारोप करण्यात आला सदर कार्यक्रम प्रसंगी प्रतापिता ब्रम्हकुमारी ईश्वरी विश्व विद्यालयाच्या विभागीय संचालीका सुनंदा बहेनजी यांनी मन परिवर्तना विषयी आध्यात्मीक मार्गदर्शन केले.या वेळी शिबीरात सहभाग घेतलेल्या  बंद्यांनी मनोगत व्यक्त केली.उपस्थित कार्यक्रमाच्या वेळी कारागृह अधिक्षक,श्री.चंद्रमणी इंदूरकर यांनी बंद्यांमध्ये सकारात्मक बद्दल होत असल्याचे सांगीतले पुढे अध्यन निरंतर चालू ठेवण्याचे आव्हान केले.



## आरोग्य विषयक

### अहमदनगर जिल्हा कारागृह येथे आरोग्य सप्ताहाचे आयोजन

दि.८.४.२०२२ रोजी अहमदनगर जिल्हा कारागृह येथे जागतिक आरोग्य दिन तथा सप्ताह निमित्त जिल्हा सामान्य रुग्णालय, अहमदनगर आणि यशवंतराव चव्हाण दंत विद्यालय, अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने कारागृहातील बंदी तसेच अधिकारी व कर्मचारी यांचे करीता व्यसन मुक्ती आणि त्यामुळे होणारे दुष्परिणाम समुपदेशन शिबीर आयोजित करण्यात आले होते. यासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयाचे दंतरोग तज्ञ डॉ.दीपक केळगांद्रे, विद्यालयाचे दंतरोग तज्ञ डॉ.निखिल बोंबले, डॉ.सुमित, डॉ.पंकज, डॉ.तेजस उपस्थित होते. डॉ.दीपक आणि डॉ.निखिल यांनी तंबाखू सेवनामुळे होणारे आजार, लक्षणे, आरोग्य तसेच आर्थिकदृष्टया होणारे नुकसान तसेच व्यसनमुक्त होण्यासाठी वापरले जाणारे विविध पैलू यांवर भाष्य करुन बंदी बांधवांचे समुपदेशन केले. तसेच डॉ.सुमित यांनी लाईव्ह डेमोद्वारे बंदी बांधवांना व्यासनाव्दारे विविध आजारांनी कसे प्रत्येक व्यक्तीला ग्रासले जात हे समजावून सांगितले. राबविण्यात आलेल्या शिबीरासाठी एकूण १६४ बंद्यांचे तसेच कारागृह कर्मचारी यांचे समुपदेशन करण्यात आले. यामध्ये तपासणीअंती एकूण १४ बंद्यामध्ये संभाव्य लक्षणे आढळली आहेत आणि त्यांचेवर पुढील उपचार सुरु करुन घ्यावयाची काळजी वयक्तिकरित्या समजावून सांगितले आहे.या शिबीरासाठी कारागृह अधीक्षक, वरिष्ठ तुरुंगाधिकारी, वैद्यकीय अधिकारी, औषध निर्माता व इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



### येरवडा महिला कारागृह येथे आरोग्य विषयक शिबीर आयोजीत

दि. १२.०४.२०२२ रोजी येरवडा महिला कारागृह येथे इनर व्हिल क्लब ऑफ पुणे इम्पिरीयल व सह्याद्री हॉस्पीटल, नगर रोड, पुणे यांचे संयुक्त विद्यमाने BoneDensity check-up / Heart Check-up / General check-up शिबीराचे संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती निपा जोग, श्रीमती साक्षी निकम, श्रीमती सुधा भट, श्रीमती सुवर्णा देशपांडे व श्रीमती प्रिती परदेशी यांनी आयोजन केले.

सहयाद्री हॉस्पीटल पुणे यांचे वतीने डॉ. श्रध्दा विचारे, सिस्टर सुधा, श्री. संतोष, श्री प्रविण, श्री सुनिल व श्री कामेश झोपे यांनी महिला बंद्यांची Bone Density check-up / Heart Check-up / General check-up केले. १३७ महिला बंदींनी या शिबीराचा लाभ घेतला. सदर कार्यक्रमाचे महिला तुरुंगाधिकारी, कारागृह शिक्षिका, कारागृह महिला शिपाई यांनी यशस्वी आयोजन केले.





### नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह येथे त्वचारोग तपासणी व उपचार शिबीराचे आयोजन

दि.२९.०४.२०२२ रोजी नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह येथे समता फाऊंडेशन अंतर्गत कारागृहात बंद्यासाठी त्वचारोग तपासणी व उपचार शिबीराचे आयोजन करण्यात आले. समता फाऊंडेशनचे डॉ.समिर लासुरे बंदी पुनर्वसन अधिकारी श्री.सचिन बागुल उपस्थित होते. यात बंद्यांची तपासणी करुन उपचार करण्यात आले. शिबीरात त्वचारोग तपासणी व उपचाराचा २५४ बंद्यांनी लाभ घेतला. सदर कार्यक्रमास कारागृह अधिक्षक, वरीष्ठ तुरुंगाधिकारी तसेच कारागृहातील इतर अधिकारी /कर्मचारी उपस्थित होते.

### ठाणे मध्यवर्ती कारागृह येथे त्वचारोग शिबीरांचे आयोजन

दि.९.०४.२०२२ रोजी ठाणे मध्यवर्ती कारागृह येथील बंद्यांसाठी त्वचारोग शिबीर प्रिझन मिनिस्ट्री ऑफ इंडिया शाखा ठाणे यांच्या मार्फत आयोजित करण्यात आले होते. त्वचारोग शिबीरा मध्ये एकूण ३९४ बंद्यांनी तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करुन मोफत औषध देण्यात आली.



### ठाणे मध्यवर्ती कारागृह येथे त्वचारोग शिबीरांचे आयोजन

दि.१७.०४.२०२२ रोजी ठाणे मध्यवर्ती कारागृह येथील बंद्यांसाठी विषेश मोहीम अंतर्गत वय वर्षे ४० पेक्षा जास्त वयाच्या ६०० बंद्यांची D Echo वैद्यकीय चाचणी करण्यात आली असता त्यातील ८० बंद्यांची चाचणी अहवाल समाधनकारक दिसून आला नाही, यास्तव ज्युपीटर हॉस्पीटल, ठाणे यांचे सहाकार्याने व श्री.जयजीत सिंग, यांचे ठाणे पोलीस आयुक्त, यांचे विशेष प्रयत्नाने २ D Echo चाचणी मशीन कारागृहात आणून ज्युपीटर हॉस्पीटल यांचे कार्डीओलॉजीस्ट तंत्रज्ञ व वैद्यकीय अधिकारी यांचेव्दारे दि. १७.०४.२०२२ रोजी कारागृहातील ९५ बंद्यांची हृदयाविकारा संबंधित अद्यायावर २ D Echo चाचणी करण्यात आली आहे.



### यवतमाळ जिल्हा कारागृह येथे आरोग्य तपासणी शिबीर

दि.२९.४.२०२२ रोजी यवतमाळ जिल्हा कारागृहातील बंद्यांसाठी अस्तित्व फाउंडेशनच्या आरोग्य समितीव्दारे भव्य मल्टी स्पेशालिस्ट आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. कारागृहातील बंद्यांची आरोग्य तपासणी करण्यासाठी आरोग्य समितीच्या अध्यक्षा डॉ.अंजली गवार्ले, मूलव्याध भगंदर तज्ञ,या शिबीरासाठी अस्तित्व फाउंडेशनच्या अध्यक्षा अलका कोथळे तथा सचिव डॉ.कविता करोडदेव बोरकर आयुर्वेद तज्ञ यांनी विविध तज्ञ डॉक्टर तसेच अतीश गजबिय यांना आमंत्रित केले आहे.खालील सर्व डॉक्टर्सचे अमूल्य सहकार्य या शिबीराला लाभणार आहे.१) डॉ.अनिल पटेल,नाक कान घसा तज्ञ २) डॉ.सुरेखा रलोटा स्त्रीरोग तज्ञ ३) डॉ.भरत राठोड हृदयरोग तज्ञ मेडिसिन ४) डॉ.महेश चव्हाण,अस्तिरोग तज्ञ ५) डॉ.अनुप गोरे, दंतरोग तज्ञ ६) डॉ. ओमप्रकाश शजळमकर,हृदयरोग व अस्थमा तज्ञ ७) डॉ.पियुष कोटगिरवार,जनरल फिजिशियन ७) डॉ.कल्याणी गुलहाने,नेत्र रोग तज्ञ ८) डॉ.स्वाती अ.जटाळे त्वचारोग तज्ञ ९) डॉ.विद्या नागपूरे,आयुर्वेद तज्ञ १०) डॉ.मंगला निकम,आयुर्वेद तज्ञ ११)डॉ.निमिता चव्हाण होमिओपॅथी,त्वचारोग तज्ञ १२) डॉ. हर्षा साव आयुर्वेद तज्ञ १३) डॉ.स्नेहा लंगडे इत्यादी वैद्यकीय अधिकारांचा सहभाग लाभला आहे.



### सिंधुदुर्ग जिल्हा कारागृह येथे वैद्यकीय तपासणी शिबीराचे आयोजन

दि.२५.४.२०२२ रोजी सिंधुदुर्ग जिल्हा कारागृहामध्ये साथी संस्थेच्या माध्यमातून बंद्यांसाठी वैद्यकीय तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.सदर बंद्यांची एच.आय.व्ही व्हयरल हेपेटायटिस, शुगर व इतर तपासणी करण्यात आली. तसेच जिल्हा एड्स नियंत्रण विभाग जिल्हा शासकीय रुग्णालय, सिंधुदुर्ग यांचेमार्फत बंद्यांना एच.आय.व्ही.एड्स विषयक मार्गदर्शन व समुपदेशन करण्यात आले.



### येरवडा खुले कारागृह येथे नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन

दि.१३.४.२०२२ रोजी येरवडा खुले कारागृह येथे बंदी कल्याण व पुनर्वसन प्रकल्प पुणे (प्रयास संस्था,मुंबई) रोटरी क्लब येरवडा खुले कारागृह बंद्यांकरीता, कर्मचारी व कुटुंबीयांकरीता नेत्रतपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. व त्यात ५१ बंद्यांची व ५६ कर्मचारी कुटुंबियांची नेत्र तपासणी करण्यात आली असून आवश्यकतेनुसारच चष्मे वाटप करणे नियोजित आहे.

### मुंबई मध्यवर्ती कारागृह येथे दंत चिकित्सा शिबीराचे आयोजन

दि.१३.४.२०२२ रोजी मुंबई मध्यवर्ती कारागृहामध्ये नायर रुग्णालय मुंबई यांचे मार्फत दंत चिकित्सा शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीरामध्ये एकुण ६ वैद्यकीय अधिकारी यांचे टिमने या कारागृहातील बंद्यांची दंत तपासणी करुन बंद्यांना जास्तीतचा त्रास होत असल्यामुळे त्यांचे दात काढण्यात आलेले आहेत.

### मुंबई मध्यवर्ती कारागृह येथे त्वचारोग शिबीराचे आयोजन

दि.१२.४.२०२२ रोजी मुंबई मध्यवर्ती कारागृहामध्ये समता फाऊंडेशन यांचे मार्फत त्वचारोग शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.सदर शिबीरामध्ये २९६ बंद्यांवर उपचार करुन औषधपचार करण्यात आलेला आहे.सदर शिबीरामध्ये २ वैद्यकीय अधिकारी यांचेसह समता फाऊंडेशनचे १ सहकारी उपस्थित होते.

## विधी विषयक सहाय्य

**येरवडा महिला कारागृह, पुणे येथे कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर**

**तसेच Breastcancer /Gynacological तपासणी शिबीर**

दि. ३१.०३.२०२२ रोजी येरवडा महिला कारागृह जिल्हा विधी सेंवा प्राधिकरण व लायन्स क्लब ऑफ पुणे यांचे मार्फत कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर तसेच Breast cancer/ Gynacological तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. लायन्स क्लब ऑफ पुणे मार्फत ॲड.प्रिती परांजपे, व सेवानिवृत्त न्यायाधीश ॲड. अंजली आपटे यांनी महिलांना कायदे विषयक मार्गदर्शन केले.तसेच जेष्ठ आरोग्य सेविका श्रीमती सरिता सोनवणे यांचे मार्गदर्शनाखाली श्रीमती सरोज सोनवणे व श्रीमती स्मिता मेहेंदळे यांनी महिला बंद्यांची Breast cancer तपासणी केली. तसेच डॉ. सुमित्रा भोसले यांचे मार्गदर्शनाखाली डॉ. सोनाली घोरपडे, डॉ. गायत्री सुर्यवंशी व डॉ. हरजीत कौर यांनी महिला बंद्यांची Gynacological तपासणी केली. श्रीमती आर. ए. खिलारी- महिला तुरुंगाधिकारी, श्रीमती रजनी मोटके- शिक्षिका, श्रीमती श्रध्दा सूर्वे, जयश्री जाधव- महिला शिपाई यांनी प्रस्तुत कार्यक्रमाचे व आरोग्यशिबीराचे यशस्वी आयोजन केले. सदर आरोग्यशिबीराचा ११० महिला बंद्यांनी लाभ घेतला.



### विविध उपक्रम

**कारागृह उपमहानिरीक्षक कार्यालय नागपूर येथे सनमांचिन्ह प्राप्त अधिकारी/कर्मचारी यांचा सत्कार**

कारागृह उपमहानिरीक्षक कार्यालय नागपूर येथे मा.श्रीमती स्वाती साठे मॅडम, कारागृह उपमहानिरीक्षक, पूर्व विभाग, नागपूर यांचे शुभहस्ते कारागृह उपमहानिरीक्षक कार्यालय नागपूर येथे अपर पोलीस महासंचालक यांचे सन्मान चिन्ह प्राप्त अधिकारी/ कर्मचारी यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.



**दौलतराव जाधव तुरुंगाधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय,येरवडा,पुणे e Prisons प्रणालीचे प्रशिक्षण आयोजीत**

महाराष्ट्रातील सर्व कारागृहांत ई-प्रिझन्स प्रणाली कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. सदर प्रणालीच्या वापराकरीता दौलतराव जाधव तुरुंगाधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, येरवडा, पुणे येथे दि.२५ ते २७ एप्रिल दरम्यान कारागृह कर्मचारी यांचे करीता e Prisons प्रणालीचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणाकरीता १३ कारागृहांचे एकुण २० कर्मचारी उपस्थित होते.



**दौलतराव जाधव तुरुंगाधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय,येरवडा,पुणे e Prisons प्रणालीचे प्रशिक्षण आयोजीत**

महाराष्ट्रातील सर्व कारागृहांत ई-प्रिझन्स प्रणाली कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. सदर प्रणालीच्या वापराकरीता दौलतराव जाधव तुरुंगाधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, येरवडा, पुणे येथे दि.४ ते ६ मे दरम्यान कारागृह कर्मचारी यांचे करीता e Prisons प्रणालीचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणाकरीता १८ कारागृहांचे एकुण १९ कर्मचारी उपस्थित होते.



## येरवडा महिला कारागृह, पुणे येथे महिला कारागृहास संगणक संच भेट

दि. २३.०३.२०२२ रोजी येरवडा महिला कारागृह, पुणे येथे इनर व्हिल क्लब ऑफ पुणे इम्पिरीयल यांचे मार्फत महिला कारागृहास २ नग संगणक संच भेट देण्यात आले. या प्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती निपा जोग यांनी बंद्याना मार्गदर्शन केले. प्रस्तूत कार्यक्रमास संस्थेच्या वतीने श्रीमती शोभा श्रीकांत, श्रीमती सुधा भट, श्रीमती साक्षी निकम व श्रीमती प्रिती परदेशी उपस्थित होते.श्रीमती स्वाती पवार- महिला तुरुंगाधिकारी, श्रीमती रजनी मोटके - शिक्षिका, श्रीमती सुनिता बारवकर - महिला शिपाई यांनी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले.




## नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह येथे“ग्रीन जिम”

दि.२८.०४.२०२२ रोजी नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह येथे मा.खासदार डॉ.श्री.नरेंद्र जाधव यांच्या खासदार निधीतुन सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कारागृह परिसरात कर्मचा-यांसाठी तसेच सर्कल परिसरात बंद्यांसाठी “ग्रीन जिम” उभारण्यात येत आहे. कर्मचा-यांचे तसेच बंद्यांचे शारीरिक स्वास्थ सुदृढ, निरोगी व उत्साही राहण्यासाठी ग्रीन जिमची उभारणीचे काम प्रगती पथावर आहे. लवकरच उद्घाटन करुन ग्रीन जीम कर्मचारी व बंद्यांना वापराकरीता खुली करण्यात येणार आहे.



## नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह येथे प्रवचन कार्यक्रमाचे आयोजन

दि.२२.०४.२०२२ रोजी नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह येथे श्री. दि.जैन ग्लोबल महासभा व श्री. सकल जैन समाज नाशिक यांच्या संयुक्त विद्यमानाने प.पू.राष्ट्रसंत आचार्य श्री. पुलकसागरजी महाराज यांचा "माणसाने आदर्श व आनंदी जीवन कसे जगावे" या विषयावर बंद्यासाठी विशेष प्रवचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या वेळी संस्थेचे विश्वस्त ॲड.श्री.राहुलजी कासलीवाल, महामंत्री श्री.राजनजी शहा, मुकेशजी जैन, श्री.अजितजी जैन, श्री.अंशुलजी लोहाडे, पवनजी पोटणी उपस्थित होते. प्रवचनास सुमारे १२०० बंद्यांनी सहभाग नोंदविला. सदर कार्यक्रमास कारागृह अधिक्षक,वरीष्ठ तुरुंगाधिकारी तसेच इतर अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.



## नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह येथे ईलेक्ट्रीशियन कोर्स पुर्ण केलेल्या बंद्यांना प्रमाणपत्र वाटपाचा कार्यक्रम

दि.१८.०४.२०२२ रोजी नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह येथे श्री. श्री. ग्रामिण विकास संस्था, नाशिक. यांचेमार्फत नोव्हेंबर २०१९ मध्ये ईलेक्ट्रीशियन कोर्स पुर्ण केलेल्या बंद्यांना प्रमाणपत्र वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कारागृहातील ६० बंद्यांनी सदर कोर्स यशस्वीरित्या पुर्ण केला होता. श्री. श्री. ग्रामिण विकास संस्थेचे अध्यक्ष श्री.आर.एन.मोरानीजी, संस्थेचे विश्वस्त श्री.विजय हाकेजी, यांचे हस्ते बंद्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.सदर कार्यक्रमास कारागृह अधिक्षक,वरीष्ठ तुरुंगाधिकारी तसेच इतर अधिकारी /कर्मचारी उपस्थित होते.





**नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह येथे समुपदेशन शिबीराचे आयोजन**

दि.०५.०४.२०२२ रोजी नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह येथे एम.ई. होलीस्टीक सेंटर,नाशिक. या संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती. डॉ.मंजु राठी यांनी कारागृहातील पुरुष बंदी व महिला बंदींना मानसिक ताण-तणावावर आधारीत समुपदेशन शिबीर घेतले. शिबीरात ८५ बंद्यांनी सहभाग नोंदविला.सदर कार्यक्रमास अधिकारी /कर्मचारी उपस्थित होते.



**नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे बंदयांच्या नातेवाईकासाठी पाणपोईचे उद्घाटन**

दि. १४/०४/२०२२ रोजी नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे समता फांऊडेशन, मुंबई यांचे सौजन्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंती निमित्त बंदयांच्या नातेवाईकासाठी पाणपोईचे उद्घाटन.



### नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह येथे गुड फ्रायडे व ईस्टर संडे सणानिमित्त कार्यक्रम आयोजीत

दि.१६.०४.२०२२ रोजी नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह येथे गुड फ्रायडे व ईस्टर संडे सणानिमित्त भारतीय सेवक संगती, नागपुर व्दारा कारागृहातील बंद्यासाठी भक्ती गीते व प्रवचनाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य मार्गदर्शक व आयोजक श्री.अमित आर्यन, विशेष गीतकार श्री.अजय चव्हाण, सहाय्यक श्री.तन्मय ठोंबरे, विशेष सहाय्यक श्री.अनुराग आव्हाड, समाजसेवक श्रीमती.रीटा काटे, श्रीमती.अर्चना तेजडे यांनी बंद्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात ३५० बंदी सहभागी झाले होते. सदर कार्यक्रमास अधिकारी /कर्मचारी उपस्थित होते.



### ठाणे मध्यवर्ती कारागृह येथे गांधी परीक्षेचे आयोजन

दि.१२.०४.२०२२ रोजी ठाणे मध्यवर्ती कारागृह येथे कारागृहातील बंद्यांसाठी मुंबई सर्वोदय मंडळ,मुंबई या सेस्थेच्या सहाय्याने महात्मा गांधीजींच्या जीवनावर आधारीत गांधी परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.सदर परीक्षेत कारागृहातील ५६ पुरुष बंदी व ११ महिला बंद्यांनी सहभाग घेतला.सदर गांधी परीक्षेत यशस्वी बंद्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले आहे.



महाराष्ट्र शासन

गृह विभाग

## अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

### ठाणे मध्यवर्ती कारागृह येथे आधारकार्ड नोंदणी शिबीराचे आयोजन

ठाणे मध्यवर्ती कारागृह येथे कारागृहातील बंद्यांसाठी सन्मा.न्यायालयाकडून जामिन मंजूर करण्यासाठी तसेच विविध योजनांचा लाभ घेण्याकरीता आधार कार्डची मागणी केली जाते. बहूतेक बंद्यांचे जामीन ओळखपत्रा अभावी प्रलंबीत आहेत.त्या अनुषंगाने दि.३०.०४.२०२२ ते ०७.०५.२०२२ पर्यंत मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हा न्याय दंडाधिकारी,ठाणे यांच्या मार्फत काराहातील एकूण ३२१ बंद्यांचे आधारकार्ड नोंदणी करण्यात करीता शिबीराचे आयोजन करण्यात आले.




### अहमदनगर जिल्हा कारागृह येथे ध्यानधारणा शिबीराचे आयोजन

दि.२३.४.२०२२ रोजी अहमदनगर जिल्हा कारागृह येथे स्वतंत्र भारतातचा अमृत महोत्सोव साजरा करण्याच्या औचीत्याने कारागृहातील बंदी बांधव यांचे करीता ज्यागिनी प्रजापिता ब्रम्हकुमारी राजेश्वरी दिदी, संचालीका, ईश्वरीय विश्वविद्यालय, अहमदनगर तसेच जिल्हा विधी सेवाच्या वकील श्रीमती निर्मला चौधरी, श्रीमती सुप्रभा दिदी यांच्या संयुक्त विद्यमाने क्रोधमुक्त, तनावमुक्त, ध्यानधारणा, ध्यानधारने मधून मन शांती कशी प्राप्त होते. वकील आणि केस चालवण्याची आदर्श पध्दती या विविध विषांवर समुपदेशनपर मार्गदर्शन करण्यात आले आहे. सर्व बंदी बांधवांनी सदरील शिबीराचा उत्साहाने लाभ घेतला. या वेळी कारागृह अधीक्षक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



### किशोर सुधारालय,नाशिक येथे इलेक्ट्रिक वायरमन प्रशिक्षणाचे आयोजन

किशोर सुधारालय, नाशिक येथील किशोरांसाठी माहे मार्च-२०२२ पासून पवार टेक्निकल इन्स्टिटयूट, नाशिक यांचे मार्फत इलेक्ट्रिक वायरमन प्रशिक्षण चालू आहे. किशोर बंदी इलेक्ट्रिक उपकरणांची दुरुस्ती करतांना व प्रशिक्षण घेतांना.



### लातूर जिल्हा कारागृह वर्ग-१ येथे विपश्यना शिबीर आयोजन

लातूर जिल्हा कारागृह वर्ग-१ येथील बंद्याकरीता श्री.श्री.रवि शंकरजी यांचे आर्ट ऑफ लिव्हिंग या संस्थेमार्फत सहा दिवसाचे विपश्यना शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.सदर शिबीरास १०० पुरुष बंदी व १२ महिला बंदी उपस्थित होते.सदर कार्याक्रमास सन्मा.न्यायाधीश श्रीमती कोसमकर मॅडम, सन्मा.न्यायाधीश श्री.कायगुंडे, सन्मा.न्यायाधीश श्री.शिंदे,आर्ट ऑफ लिव्हींगचे शिक्षक श्रीमती प्रणिता चाकूर, मॅडम,श्री.विवेक वावरे,श्रीमती सुलन खांडेकर,श्री.भारत काळे यांच्या मार्गदर्शनाखाली सदरील कार्यक्रम संपन्न झाला.या कार्यक्रमास कारागृह अधीक्षक व अधिकारी,कर्मचारी उपस्थित होते.

### वाशिम जिल्हा कारागृह येथे कारागृहातील बंद्यांकरीता पाणपोही कार्यान्वीत

दि.१३.४.२०२२ रोजी वाशिम जिल्हा कारागृहातील बंद्यांकरीता समता फाऊंडेशन, मुंबई यांचे मार्फत पाणपोही बसविण्यात आली.




### येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे बंद्यांसाठी SHINE Program for life कार्यक्रमाचे आयोजन

दि.११ मार्च २०२२ ते ६ मे २०२२ या कालावधीत दर मंगळवार व शुक्रवारी ११.०० ते ४.०० या वेळेत व्हिक्टर मनिकम फाऊंडेशन, मुंबई या संस्थेमार्फत बंद्यांसाठी शाईन प्रोग्राम फॉर लाईफ (बंद्यांना समुपदेशन) या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमामध्ये ३० बंद्यांनी सहभाग घेतला. सदर कार्यक्रमात माझे प्रतिबिंब, माझे अस्तित्वाचे कारण, माझ्या जीवनातील यश-अपयशाचा प्रवास, मी कोण आहे, कृतज्ञतेचा शोध व अभिव्यक्ति तसेच जीवनाचे धेय्य व भविष्याचे सृजन या बाबत बंद्यांना मार्गदर्शन करून समुपदेशन करण्यात आले.सदर कार्यक्रमात सहभाग घेतलेल्या बंद्यांना व्हिक्टर मनिकम फाऊंडेशन, मुंबई या संस्थेमार्फत प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच सदर कार्यक्रम यशस्विपणे पार पाडण्यास सहकार्य केलेले अधिकारी कारागृह अधिक्षक श्रीमती राणी भोसले, वरिष्ठ तुरूंगाधिकारी श्री.सोमनाथ म्हस्के, शिक्षक श्री.अंगद गव्हाणे, श्री.योगेश पाटील यांनाही सदर संस्थेच्या वतीने प्रमाणपत्र देवून सन्मानीत करण्यात आले.



### नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची भेट

नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे मा.श्रीमती मनीषा वर्मा, प्रधान सचिव, कौशल्य विकास, रोजगार उधोजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र राज्य, यांची कारागृहास भेट मा.श्रीमती मनीषा वर्मा, प्रधान सचिव कौशल्य विकास रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग महाराष्ट्र राज्य, यांनी दिनांक १०/०४/२०२२ रोजी कारागृहास भेट देवून कारागृहाची पाहणी केली तसेच कारागृहातील पुरूष व महिला बंद्यांना मार्गदर्शन केले.




### नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची भेट

दिनांक १२/०४/२०२०२२ रोजी नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे मा.श्रीमती आभा पांडे, सदस्या, महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांनी कारागृहातील महिला विभागास भेट देवून पाहणी केली तसेच महिला बंद्यांना सोईसुविधांबाबत विचार पूस केली. स्वयंपाकगृह व महिला विभागाची पाहणी केली.तसेच महिला बंद्यांशी व त्यांचे लहान मुलांशी संवाद साधला.



**नागपूर मध्यवर्ती कारागृह**







## नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह येथे महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची भेट

दि.२२.४.२०२२ रोजी नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह येथे राज्य महिला आयोगाच्या सदस्य श्रीमती. दिपीका चव्हाण व श्रीमती.उत्कर्षा रुपवते यांनी कारागृहातील महिला विभागाची पाहणी करुन महिला बंद्यांची भेट घेतली व त्यांच्याशी संवाद साधला. तसेच कारागृह अधीक्षक प्रमोद वाघ यांच्याशी सविस्तर चर्चा केली. सदर कार्यक्रमास कारागृह अधिक्षक,वरीष्ठ तुरुंगाधिकारी तसेच इतर अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.



## बंदी व्यासपीठ- (कविता)

मानसांच्या गर्दीत माणुस
मानूसकी विसरुन गेला
या आभासी जगात मात्र
आता पैसा मोठा झाला
रात्र दिवस एकत्रच विचार
कुठे जास्त मिळेल भाव
न्यायासाठी करातात काही
खोटे-खोटे गरीबांचे हाल
श्रीमंतीचा आव आणत
स्वत:ला मिरवत राहील
पैशाच्या अहंकाराने आज
विचारांचा दुष्काळ दिसला
हे कलियुग आहे
सत्ययुग नाही
येथे आज दिले वचन
उदया पाळले जात नाही
आज काल विश्वास हा
कुठे तरीच दिसतो
बरेच ठिकाण तर
हरवलेला असतो
येथे कोणावर ठेवावा विश्वास
अन् कोणावर नाही
विश्वास ठेवला तर
विश्वासघात करणार नसल्याचा
विश्वास ही नाही
विश्वासा सोबत विश्वासघात
का होतो माहीती नाही
अजून ही आपला कोण
अन् परका कोण मला कळलच नाही.

वर्षा जयंत झांबरे (पाटील)

## सफर

सफर में हुँ जेल के,जी रहा हुँ काफी कुछ झेल के,
बाहर की दुनिया से काफी दुर,इंतजार में हुँ अपनी बेल के |
ये मेरा करम ही है,जो सामने मेरे खडा है,
मेरे वजहसे मेरा जमीर इस हालत में पडा है |
यहाँ मैं दुःखी,माँ-बाप का गम नही मिट रहा है,
सालो जैसा एक दिन मेरा यहाँ कट रहा है |
अफसोस खुद के किये पें,आँखो में है पानी,
ये किस मोड पें ले आयी,मुझे मरी नादानी |
जो हुआ सो हुआ,अब आगे मुझे बढना है,
दुनिया से नही मुझे अपने आप से लढना है |
बुराईयों को निकाल फेक अच्छे अमल करना है,
माँ-बाप के हिस्से मे बेहद खुशी भरना है |
बस अब बहोत हुआ कुछ करके दिखना है,
धरपे खुशीयां लाना है,इज्जत की रोटी खना ह |
जिनका दिल दुखाया उनको फिरसे अपना बनाना है,
मेरी खोयी हुई इज्जत फिरसे मुझ्को`माना है |
जैसाी करनी वैसा फल,आज जो बोऊंगा मिलेगा कल,
मेहनत मे मुसीबत देगी दखल मुसीबत से लडके होना है सफल |
हमें आपस में लडा दे ऐसे मुद्दे अनेक है,
भगवान और खुदा एक है,इन्सानियत का अमल नेक है |

हारिस हारुन खान
न्यायाधिन बंदी, ठाणे मध्यवर्ती कारागृह

रजिस्ट्री सं॰ डी॰ एल॰—(एन)04/0007/2003—22 REGISTERED NO. DL—(N)04/0007/2003—22

भारत का राजपत्र
The Gazette of India

सी.जी.-डी.एल.-अ.-18042022-235184
CG-DL-E-18042022-235184

असाधारण
EXTRAORDINARY
भाग II — खण्ड 1
PART II — Section 1
प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं॰ 11] नई दिल्ली, सोमवार, अप्रैल 18, 2022/ चैत्र 28, 1944 (शक)
No. 11] NEW DELHI, MONDAY, APRIL 18, 2022/CHAITRA 28, 1944 (SAKA)

इस भाग में भिन्न पृष्ठ संख्या दी जाती है जिससे कि यह अलग संकलन के रूप में रखा जा सके।
Separate paging is given to this Part in order that it may be filed as a separate compilation.

## MINISTRY OF LAW AND JUSTICE
## (Legislative Department)

*New Delhi, the 18th April, 2022/Chaitra 28, 1944 (Saka)*

The following Act of Parliament received the assent of the President on the 18th April, 2022 and is hereby published for general information:—

# THE CRIMINAL PROCEDURE (IDENTIFICATION) ACT, 2022

No. 11 of 2022

[18*th April*, 2022]

An Act to authorise for taking measurements of convicts and other persons for the purposes of identification and investigation in criminal matters and to preserve records and for matters connected therewith and incidental thereto.

Be it enacted by Parliament in the Seventy-third Year of the Republic of India as follows:—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Act may be called the Criminal Procedure (Identification) Act, 2022.

(*2*) It shall come into force on such date as the Central Government may, by notification in the Official Gazette, appoint.

Definitions.

**2.** (*1*) In this Act, unless the context otherwise requires,—

(*a*) "Magistrate" means,—

(*i*) in relation to a metropolitan area, the Metropolitan Magistrate;

(*ii*) in relation to any other area, the Judicial Magistrate of the first class; or

(*iii*) in relation to ordering someone to give security for his good behaviour or maintaining peace, the Executive Magistrate;

(*b*) "measurements" includes finger-impressions, palm-print impressions, foot-print impressions, photographs, iris and retina scan, physical, biological samples and their analysis, behavioural attributes including signatures, handwriting or any other examination referred to in section 53 or section 53A of the Code of Criminal Procedure, 1973; 2 of 1974.

(*c*) "police officer" means the officer-in-charge of a police station or an officer not below the rank of Head Constable;

(*d*) "prescribed" means prescribed by rules made under this Act;

(*e*) "prison officer" means an officer of prison not below the rank of Head Warder.

(2) Words and expressions used herein and not defined but defined in the Indian Penal Code and the Code of Criminal Procedure, 1973 shall have the same meanings respectively assigned to them in those Codes. 45 of 1860. 2 of 1974.

Taking of measurement.

**3.** Any person, who has been,—

(*a*) convicted of an offence punishable under any law for the time being in force; or

(*b*) ordered to give security for his good behaviour or maintaining peace under section 117 of the Code of Criminal Procedure, 1973 for a proceeding under section 107 or section 108 or section 109 or section 110 of the said Code; or 2 of 1974.

(*c*) arrested in connection with an offence punishable under any law for the time being in force or detained under any preventive detention law,

shall, if so required, allow his measurement to be taken by a police officer or a prison officer in such manner as may be prescribed by the Central Government or the State Government:

Provided that any person arrested for an offence committed under any law for the time being in force (except for an offence committed against a woman or a child or for any offence punishable with imprisonment for a period not less than seven years) may not be obliged to allow taking of his biological samples under the provisions of this section.

Collection, storing, preservation of measurements and storing, sharing, dissemination, destruction and disposal of records.

**4.** (*1*) The National Crime Records Bureau shall, in the interest of prevention, detection, investigation and prosecution of any offence under any law for the time being in force,—

(*a*) collect the record of measurements from State Government or Union territory Administration or any other law enforcement agencies;

(*b*) store, preserve and destroy the record of measurements at national level;

(*c*) process such record with relevant crime and criminal records; and

(*d*) share and disseminate such records with any law enforcement agency,

in such manner as may be prescribed.

(*2*) The record of measurements shall be retained in digital or electronic form for a period of seventy-five years from the date of collection of such measurement:

Provided that where any person, who has not been previously convicted of an offence punishable under any law with imprisonment for any term, has had his measurements taken according to the provisions of this Act, is released without trial or discharged or acquitted by the court, after exhausting all legal remedies, all records of measurements so taken shall, unless the court or Magistrate, for reasons to be recorded in writing otherwise directs, be destroyed from records.

(*3*) The State Government and Union territory Administration may notify an appropriate agency to collect, preserve and share the measurements in their respective jurisdictions.

Power of Magistrate to direct a person to give measurements.

**5.** Where the Magistrate is satisfied that, for the purpose of any investigation or proceeding under the Code of Criminal Procedure, 1973 or any other law for the time being in force, it is expedient to direct any person to give measurements under this Act, the Magistrate may make an order to that effect and in that case, the person to whom the order relates shall allow the measurements to be taken in conformity with such directions. (2 of 1974.)

Resistance to allow taking of measurements.

**6.** (*1*) If any person who is required to allow the measurements to be taken under this Act resists or refuses to allow taking of such measurements, it shall be lawful for the police officer or prison officer to take such measurements in such manner as may be prescribed.

(*2*) Resistance to or refusal to allow the taking of measurements under this Act shall be deemed to be an offence under section 186 of the Indian Penal Code. (45 of 1860.)

Bar of suit.

**7.** No suit or any other proceeding shall lie against any person for anything done, or intended to be done in good faith under this Act or any rule made thereunder.

Power to make rules.

**8.** (*1*) The Central Government or the State Government may, by notification in the Official Gazette, make rules for carrying out the purposes of this Act.

(*2*) In particular, and without prejudice to the generality of the foregoing provisions, such rules may provide for all or any of the following matters, namely:—

(*a*) the manner of taking measurements under section 3;

(*b*) the manner of collection, storing, preservation of measurements and sharing, dissemination, destruction and disposal of records under sub-section (*1*) of section 4;

(*c*) the manner of taking of measurements under sub-section (*1*) of section 6;

(*d*) any other matter which is to be prescribed, or in respect of which provision is to be made.

(*3*) Every rule made by the Central Government under this Act shall be laid, as soon as may be after it is made, before each House of Parliament, while it is in session, for a total period of thirty days which may be comprised in one session or two or more successive sessions, and if, before the expiry of the session immediately following the session or the successive sessions aforesaid, both Houses agree in making any modification in the rule or both Houses agree that the rule should not be made, the rule shall thereafter have effect only in such modified form or be of no effect, as the case may be; so, however, that any such modification or annulment shall be without prejudice to the validity of anything previously done under that rule.

(*4*) Every rule made by the State Government under this Act shall be laid, as soon as may be after it is made, before each House of the State Legislature where it consists of two Houses, or where such Legislature consists of one House, before that House.

Power to remove difficulties.

**9.** (*1*) If any difficulty arises in giving effect to the provisions of this Act, the Central Government may, by order, published in the Official Gazette, make such provisions not inconsistent with the provisions of this Act as appear to it to be necessary for removing the difficulty:

Provided that no such order shall be made under this section after the expiry of three years from the commencement of this Act.

(*2*) Every order made under this section shall be laid, as soon as may be after it is made, before each House of Parliament.

Repeal and saving.

**10.** (*1*) The Identification of Prisoners Act, 1920 is hereby repealed. (33 of 1920.)

(*2*) Notwithstanding such repeal, anything done or any action taken or purported to have done or taken including any rule, regulation, or any proceedings taken, any rule made or any direction given or any proceedings taken or any penalty or fine imposed under the repealed Act shall, in so far as it is not inconsistent with the provisions of this Act, be deemed to have been done or taken under the corresponding provisions of this Act.

(*3*) The mention of particular matters in sub-section (*2*) shall not be held to prejudice or affect the general application of section 6 of the General Clauses Act, 1897 with regard to the effect of repeal. 10 of 1897.

---

DR. REETA VASISHTA,
*Secretary to the Govt. of India.*

UPLOADED BY THE MANAGER, GOVERNMENT OF INDIA PRESS, MINTO ROAD, NEW DELHI–110002
AND PUBLISHED BY THE CONTROLLER OF PUBLICATIONS, DELHI–110054.

MGIPMRND—116GI(S3)—18-04-2022.

## बातमी कारागृहाची

# कैद्यांना कर्जवाटप

## गृहमंत्र्यांच्या उपस्थितीत येरवडा कारागृहात कार्यक्रम

म. टा. प्रतिनिधी, येरवडा

'कर्जासाठी अर्ज करणाऱ्या आणि बँकेच्या नियमात पात्र ठरणाऱ्या सर्व कैद्यांना 'जिव्हाळा' योजनेंतर्गत कर्ज दिले जाणार आहे,' अशी माहिती गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी दिली. राज्य सरकार आणि महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या मदतीने तयार केलेल्या 'जिव्हाळा' योजनेंतर्गत येरवडा कारागृहातील पाच कैद्यांना प्रातिनिधिक स्वरूपात प्रत्येकी पन्नास हजार रुपयांचे कर्ज वळसे पाटील यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. या वेळी ते पत्रकारांशी बोलत होते.

कारागृह विभागाचे महानिरीक्षक अतुलचंद्र कुलकर्णी, उपमहानिरीक्षक योगेश देसाई, अधीक्षक राणी भोसले, बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर आदी अधिकारी या वेळी उपस्थित होते. तीन वर्षांपेक्षा जास्त शिक्षेचा कालावधी शिल्लक असणारे कैदी आणि शिक्षा भोगत असताना कारागृहात काम करणारे कैदी कर्ज योजनेसाठी अर्ज करू शकतात. 'कैद्याच्या उत्पनातून कर्जाची परतफेड होणार आहे. कारागृहातील कैद्यांना बँकेकडून कर्ज मिळवून देण्यारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य ठरले आहे. कर्जाच्या योजनेची नोंद देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनीदेखील घेतली आहे. कर्जाचा फायदा कैद्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह, मुलांचे शिक्षण, आरोग्य, शेती आणि शिक्षेच्या कालावधीनंतर स्वतःच्या पुनर्वसनासाठी होणार आहे,' असे पाटील यांनी सांगितले.

बँकेचे प्रशासक अनास्कर म्हणाले, 'सामाजिक बांधिलकी डोळ्यासमोर ठेवून बँकेकडून प्रथमच कारागृहातील कैद्यांना कर्ज वाटप होत आहे. भारतातच नव्हे, तर जगात प्रथमच कैद्यांसाठी कर्जाची योजना सुरू झाली आहे. कारागृहात काम करणाऱ्या कैद्यांना मिळणाऱ्या उत्पन्नातून (मोबदला) कर्जाची परतफेड होणार आहे. येरवडा कारागृहातून प्राप्त झालेल्या २२२ अर्जांमध्ये सर्वाधिक कैद्यांनी शेतीसाठी कर्जाची मागणी केली आहे. बँकेकडून सात टक्के दराने कर्ज दिले जाणार असून, कर्ज परतफेड रकमेच्या एक टक्के रक्कम कैद्यांच्या कल्याण निधीत जमा होणार आहे. येरवडा कारागृहातील कैद्यांना प्रायोगिक तत्त्वावर प्रथम पन्नास हजार रुपयांचे कर्ज वाटप केले जाणार आहे. कर्जाला मिळणारा प्रतिसाद पाहून आगामी काळात कर्जाची रक्कम एक लाख रुपयांपर्यंत वाढवली जाऊ शकते.'

कारागृह महानिरीक्षक अतुलचंद्र कुलकर्णी म्हणाले, 'येरवडा कारागृहात कैद्यांना मिळणारी कर्ज योजना यशस्वी झाल्यावर राज्यात इतरत्रही 'जिव्हाळा' योजना राबवली जाणार आहे. येरवडा कारागृहातून २२२ पुरुष आणि सात महिलांनी कर्जासाठी अर्ज केला आहे. पहिल्या टप्प्यात तीन पुरुष आणि दोन महिलांना पन्नास हजार रुपयांचे कर्ज मंजूर झाले आहे.'



> "राज्यात जवळपास सर्वच कारागृहे कैद्यांनी तुडुंब भरली आहेत. त्यामुळे नवीन कारागृहे उभारण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. याविषयी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा केली आहे. नवीन कारागृह उभारणीबाबत कारागृह महानिरीक्षकांना सविस्तर अहवाल सादर करण्यास सांगितले आहे.
>
> – दिलीप वळसे पाटील, गृहमंत्री

अभिमानास्पद **प्रवासादरम्यान आईचा मृत्यू**

# ‘खाकी’ने जपली माणुसकी

नागपूर. काळजाच्या तुकड्याला छातीशी कवटाळून माऊलीचा बसमधून प्रवास सुरू होता. अचानक काळजाने झडप घातली आणि काही कळण्यापूर्वीच ती गतप्राण झाली. सोबत असलेल्या 14 वर्षीय मुलावर आभाळच कोसळले. कुणीही सोबत नाही, अनोळखी शहर, कुणाकडे जावे, काय करावे काहीच सुचत नव्हते. या अडचणीच्या प्रसंगी मध्यवर्ती कारागृहातील पोलिस कर्मचारी एकाकी मुलाच्या मदतीसाठी धावून आले. मुलाला धीर दिला. मृतदेह रुग्णालयात नेण्यापासून अंत्यसंस्कारापर्यंत सर्व सोपस्कार पार पाडले. मुलाला त्याच्या काकांच्या ताब्यात देऊन त्याचे भविष्यही सुरक्षित केले. सतत गुन्हेगारांच्या गराड्यात राहणारे कारागृहातील पोलिस कर्मचाऱ्यांनी हृदयात जपलेली संवेदनशीलता या घटनेने अधोरेखित केली. मृत महिला 45 वर्षे वयोगटातील असून मूळची दिल्लीतील रहिवासी होती. नवरा पूर्वीच जग सोडून गेला.



## तो धाय मोकलून रडत राहिला

पदरात असणारा एकुलता एक मुलगा हेच तिचे विश्व होते. काबाडकष्ट उपसून तिच मुलाचे पालन पोषण करीत होती. मुलाच्या उज्ज्वल भवितव्याचा ध्यास घेत तिने मुंबई गाठली. तिथे एका प्रसिद्ध वकिलाकडे ती कामाला होती. वर्षे लोटत होती, एव्हाना मुलगा 14 वर्षांचा झाला. काही कामानिमित्त या माऊलीला नागपुरात यायचे होते. काळजीपोटी ती मुलालासुद्धा सोबत घेऊन निघाली. बसमधून त्यांचा प्रवास सुरू होता. वाटेत तिला अस्वस्थ वाटू लागले. पण, उपचार शक्य नव्हते. नागपूरजवळ येत होते तशी तिची हालचाल मंदावत गेली. निपचित असली तरी काळजीपोटी मुलाचा हात घट्ट धरून ठेवला होता. बस नागपुरात दाखल होताच हाताची पकड सैल झाली. मुलाने तिला उठविण्याचा प्रयत्न केला. पण, ती काही केल्या उठत नव्हती. सहप्रवाशांच्या बोलण्यावरून आईचा मृत्यू झाल्याचे त्याच्या लक्षात आले आणि तो धाय मोकलून रडत राहिला.

“ कारागृहातील कर्मचारी संवेदनशील असून बाह्य जगताला मदतीसाठी नेहमीच सज्ज असतात. एकाकी मुलाला मदतीचा हात देत माणुसकी निभावली. या कर्मचाऱ्यांचा अभिमान आहे.

**-स्वाती साठे,** कारागृह उपमहानिरीक्षक, नागपूर मध्यवर्ती कारागृह.

## कर्मचाऱ्यांचा अंत्यविधीसाठी पुढाकार

शहर अनोळखी, कुणीही ओळखीचे नाही, कुणाकडे मदत मागावी हेसुद्धा कळत नव्हते. कुठूनतरी मध्यवर्ती कारागृहातील कर्मचाऱ्यांपर्यंत ही माहिती पोहोचली. अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मदतीचा निर्णय घेतला. जेलर कांदे, सुभेदार बासोळे, वाहनचालक सोळंके, रक्षक पवन जाधव आणि उज्ज्वला मदतीसाठी पोहोचले. स्थानिक पोलिसांच्या मदतीने मृतदेह मेयो रुग्णालयात पाठविण्यात आला. कसेबसे मुलाच्या काकासोबत संपर्क साधून घटनेची माहिती दिला. मृतदेह गावी घेऊन जाण्याबाबत त्यांनी असमर्थता दर्शविली. यामुळे कर्मचाऱ्यांनीच अंत्यविधीसाठी पुढाकार घेतला. गंगाबाई घाट येथे धार्मिक मान्यतेनुसार अंत्यसंस्कार पार पडले. मृत्यू प्रमाणपत्र मिळवून घेतले. हे सोपस्कार पूर्ण होईस्तोवर मुलाचे काकाही पोहोचले. त्यांनी मुलाला सोबत नेण्याची तयारी दर्शविली. त्यानुसार रीतसर दोघांचेही तिकीट काढून, जेवणाचा डबा देऊन रेल्वेने रवाना करण्यात आले.

